Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society’s

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 28/03/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की

अलेक्सेई मॅक्झिमोविच पेश्कोव्ह हा एक रशियन लेखक व राजकीय कार्यकर्ता होता. त्याला मॅक्झिम गॉर्की (रशियन: माक्सिम गोर्की) या टोपणनावाने ओळखले जाते. तो समाजवादी सत्यवाद या साहित्यपद्धतीच्या जनकांपैकी एक मानला जातो. त्याचा जन्म २८ मार्च १८६८ रोजी निझ्नीमध्ये झाला. त्याचं लहानपण विपन्नावस्थेत गेलं होतं. त्या संघर्षमय काळात त्याने जे जीवन बघितलं, त्यावर आधारलेल्या त्याच्या भटक्या आणि विमुक्तांच्या कथा गाजल्या. त्या कटू अनुभवांमुळेच त्याने लेखन करताना आपल्या नावापुढे ‘गॉर्की (कटुता)’ हे टोपण आडनाव घेतलं होतं! १९०५ सालच्या फसलेल्या राज्यक्रांतीच्या काळात तुरूंगामध्ये असताना गॉर्किने ‘सूर्याची पिल्ले’ हे नाटक लिहिले. या नाटकाची गोष्ट जरी १८६२ सालात दाखवली असली तरीही ते खरेतर तेव्हाच्या सद्य परिस्थितीवरच आधारित होते. याच वर्षी पुढे गॉर्किने अधिकृतपणे बोल्शेविक पक्षात प्रवेश केला.

वयाच्या २७ व्या वर्षी त्याची ‘चेल्काश’ ही कथा आणि त्यापाठोपाठ चार वर्षांनी आलेली ‘ट्वेंटी सिक्स मेन अँड ए गर्ल’ या कथा प्रचंड गाजल्या आणि त्याला टॉलस्टॉय आणि चेकॉव्हखालोखाल लोकप्रियता लाभली. पुढे त्याच्या ‘थ्री ऑफ देम’, ‘दी लाइफ ऑफ मेत्वेय कोझेम्याकीन’, ‘ओकुरोव्ह सिटी’ आणि ‘मदर’ यांसारख्या कादंबऱ्या आल्या; मात्र त्याला जगभर प्रसिद्धी लाभली ती त्याच्या ‘दी लोवर डेप्थ्स (ऊर्फ ‘ए नाइट्स लॉजिंग)’ या नाटकामुळे! माय चाइल्डहूड, दी ओल्ड वूमन इझेर्गील, मेकर त्शुद्र, अनटाइमली थॉट्स, डॅन्कोज बर्निंग हार्ट, दी स्पाय असं त्याचं इतरही लेखन प्रसिद्ध आहे. त्याला नोबेल पुरस्कारासाठी पाच वेळा नामांकन मिळालं होतं. मॅक्झिम गॉर्की याचे १८ जून १९३६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Mar 28, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401